# पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, सोलापूरकडील राबविण्यात येणा-या विविध योजनांची माहिती.

## सन २००९-१०

| अ.क्रं | योजनेचे नांव | योजनेचा उद्देश | निकष |
|---|---|---|---|
| **१. योजनातंर्गत योजना** | | | |
| अ | शेतक-यांच्या जमीनीवर वैरण विकासासाठी उत्तेजन | शेतक-यांच्या जनावरांना सकस हिरवा चारा उपलब्ध व्हावा. विशेषत: दुधाळ जनावरांना सकस हिरवा चारा उपलब्ध होऊन दुग्धोत्पादनात वाढ व्हावी व पशुपालकांचे आर्थिक उत्पन्न वाढावे तसेच जनावरांचे आरोग्य सदृढ व्हावे यासाठी शेतक-यांना सकस वैरणीचे पिक बियाणे यांचा पुरवठा केला जातो. बियाणे १००% अनुदानावर पुरवठा केले जातात. सदरची योजना तालुकास्तरावरील पशुधन विकास अधिकारी (वि) यांचे मार्फत राबविले जाते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी व अधिक माहितीसाठी प.वि.अ.(वि) यांच्याशी संपर्क साधावा. | या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभधारकाकडे स्वत:ची शेतजमीन असणे आवश्यक आहे. त्यासाठी ७/१२ चा उतारा अर्जा सोबत जोडावा लागतो. सबंधीत लाभधारकाकडे जनावरे त्यामध्ये किमान एका तरी दुधाळ गायीचा समावेश असावा. |
| ब | ॲस्कॅड योजनेतंर्गत लाळ खुरकुत रोग प्रतिबंधक लसीकरण | लाळ खुरकूत रोग हा विषाणूजन्य सांसर्गिक रोग आहे. या रोगाच्या प्रादुर्भावाने जनावरे निकामी होतात. विशेषत: कामाचे वळू या रोगामुळे निकामी होतात. पर्यायाने शेतक-यांचे आर्थिक नुकसान होते. हे टाळण्यासाठी शासनाने लाळ खुरकूत रोग मुक्त व्हावा म्हणून सर्व जनावरांना लाळ खुरकूत रोग प्रतिबंधक लसीकरण करण्याचा कार्यक्रम आखण्यात आलेला आहे. या लसीकरणाबाबत रोगाबाबत माहिती देण्यासाठी तालुकास्तरावर शेतक-यांना व पशुपालकांना शिबीरे आयोजीत करून प्रशिक्षण दिले जाते. याबाबत अधिक माहितीसाठी पशुधन विकास अधिकारी (वि) प.स. यांचेकडे संपर्क साधावा. | सदर योजना केंद्र व राज्य पुरस्कृत आहे. व या योजनेचा लाभ ग्राम पातळीवरील सर्व पशुपालकांना घेण्यात येतो. व सदरची लस शेतक-यांना मोफत असून फक्त रू १ सेवा शुल्क आकारून टोचली जाते. |
| क | विशेष घटक योजनेतंर्गत लाभार्थीना ५०% अनुदानावर दुधाळ जनावरांचे गट वाटप | या योजनेचा उद्देश असा आहे की, ग्राम पातळीवरील अनुसुचित जाती / नवबौध्दांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा व त्यांची आर्थिक प्रगती व्हावी. यासाठी विशेष घटक योजनेतंर्गत अनुसुचित जाती / नवबौध्द या लाभार्थीना ५०% अनुदानावर ३ संकरीत गायी अथवा ३ म्हैशी असे दुधाळ जनावरांचे गट वाटप, अशी योजना आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी तालुकास्तरावरील पशुधन विकास अधिकारी (वि) प.स. यांचेशी संपूर्क साधावा. | लाभार्थी हा अनुसुचित जाती / नवबौध्द या प्रवर्गातील असावा.<br>अनुदान मर्यादा : गायगट - २१९४५/-<br>( विम्यासह)<br>म्हैसगट - २५०८०/- |
| ड | पशुवैद्यकीय संस्थाना | पावसाळ्यात व पूरग्रस्त भागात जनावरामध्ये सांसर्गिक रोगाचा प्रादुर्भाव | सदरच्या योजनेचा लाभ सर्व स्तरातील |

| | | | |
|---|---|---|---|
| | जीवरक्षक औषधांचा पुरवठा | होतो. साथीच्या रोगामध्ये अत्यावश्यक जीवरक्षक औषधांची गरज असते. बाधीत जनावरांना जीवरक्षक औषधांचा तात्काळ पुरवठा व्हावा. यासाठी जिल्ह्यातील पशुवैद्यकीय संस्थाना या औषधांचा पुरवठा केला जातो. त्यामुळे पशुपालकांच्या पशुधनाचे आरोग्य अबाधीत राहते. व पशुपालकांचे आर्थिक नुकसाना टाळता येते. | पशुपालकांना मिळू शकतो. |
| ई | पशुवैद्यकीय दवाखाने / पशुप्रथोमचार केंद्राची स्थापना | शासनाच्या नियमानुसार ज्या गांवातील पशुधन घटक संख्या ५०००/- आहे. अशा ठिकाणी नवीन दवाखान्याची स्थापना करणे गरजेचे आहे. त्यामुळे सबंधीत गावांतील पशुधनांना वेळीच रोग प्रतिबंधक लसीकरण पशुरूग्णास वेळीच औषधोपचार व्हावा. व तात्काळ पशुआरोग्य सेवा उपलब्ध व्हावी या हेतूने नवीन पशुवैद्यकीय दवाखाना स्थापना करण्यात येतो. त्यामुळे पशुपालकांना स्थानिक पशुआरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. पशुधन घटक संस्थेच्या तुलनेत सोलापूर जिल्ह्यामध्ये ४८ दवाखान्याचा अनुशेष आहे. | नवीन पशुवैद्यकीय दवाखाना स्थापनेसाठी ज्या गांवामध्ये व त्यालगत असणा-या गावांत ५०००/- पशुधन घटक असणे आवश्यक आहे. सदरच्या गावांस वाहतुक दळण वळण, शैक्षणिक सुविधा असावी. प्रस्तावीत गावा जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यापासून कमीत कमी ८ कि.मी . अंतरावर असावे. |
| उ | पशुवैद्यकीय दवाखाने / पशुप्रथोमचार केंद्रासाठी इमारती बांधणे. | जिल्ह्यात ज्याठिकाणी पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरत आहेत. त्याठिकाणी दवाखान्याची स्वतंत्र इमारत नाही. अशा ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखाने / पशुप्रथोपमचार केंद्रासाठी स्वंतत्र इमारती बांधण्यात येतात. दवाखान्याची स्वतंत्र इमारत असल्यामुळे पशुवैद्यकीय अधिकारी, व कर्मचारी यांच्या राहणेची व्यवस्था होते. त्यामुळे अधिकारी व कर्मचारी मुख्यालयाच्या ठिकाणी राहून सबंधीत गांवातील पशुरूग्णांना आवश्यक पशु आरोग्य सेवा उपलब्ध होते. व या योजनेमुळे पशुवैद्यकीय सेवा सक्षमपणे उपलब्ध होते. | या योजनेसाठी लागणारी जागा सबंधीत गावा लगत असलेले गावठाण, नाफिक असलेली जमीन असावी. सबंधीत जागा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी , मा. आयुक्त पशुसंवर्धन यांचे नांवाने असावी. दवाखान्यासाठी जागा कमीत कमी ४० आर असावी. |
| **जिल्हा परिषद, सेस योजना** | | | |
| १ | क्षार व जीवनसत्व औषधांचा पुरवठा करणे | सोलापूर जिल्हा हा दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यात नियमित पाऊस पडत नाही. त्यामुळे जनावरांना सकस वैरण, चारा मिळू शकत नाही. त्यामुळे क्षार व जीवनस्त अभावी जनावरांमध्ये विशेषत: अनेक विकार उद्‌भवतात. जनावरांची वाढ पूर्ण होत नाही. गायी / म्हशी मध्ये माजावर न येणे वारंवार उलटणे इ. वंधत्व येते हे टाळण्यासाठी जनावरांना क्षार व जीवनसत्वाची औषधे / पावडर पुरविल्या जातात. त्यामुळे गायी /म्हैशी वेळेवर माजावर येतात. हे वंधत्व दुर झाल्याने पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळता येते. क्षार व जीवनसत्वाची पुरक | सदर योजनेचा लाभ सर्व स्तरातील पशुपालकांना मिळतो. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | औषधे जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यामधून रू.१/- सेवा शुल्क आकारून पुरविली जातात. | |
| २ | जनावरांना पिसाळलेले कुत्रे चावल्यावर १००% अनुदानावर श्वानदंशोत्तर लसमात्रा पुरवठा करणे. | जनावरांना पिसाळलेले कुत्रे चावल्यावर बाधीत जनावर पिसाळू नये म्हणून तात्काळ औषधोपचार व्हावा व पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळता यावे. यासाठी जि.प. सेस मधून १००% अनुदानावर सदरची लस पुरवठा करण्यात येते. सदरची योजना ही जिल्ह्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत राबविले जाते. | पशुधन विकास अधिकारी (वि) पं.स. यांचे शिफारस पत्र घेऊन सदर लसीचा पुरवठा केला जातो. या योजनेचा सर्व स्तरातील पशुपालकांना लाभ मिळू मिळतो. |
| ३ | रोगनिदान शिबीरे आयोजीत करणेसाठी औषधे खरेदी | जिल्ह्यातील पशुवैद्यकीय संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ज्या गांवातील पशुधनांना आरोग्याची सेवा पुरविण्याची आडचणी आहेत किंवा दवाखाना सबंधीत गांवापासून दुर आहेत अशा गांवामध्ये जनावरांचे रोगनिदान शिबीर आयोजीत केले जाते. याशिबीरात तज्ञ पशुवैद्यकांना पाचरण करून शिबीरात आलेल्या पशुरूग्णाची तपासणी करून रोगनिदान करण्यात येते. व योग्यतो औषधोपचार आवश्यक असल्यास शस्त्रक्रिया, रोगप्रतिबंधक लसीकरण, कृत्रिम रेतन, खच्चीकरण, गर्भ तपासणी, वांझ तपासणी इ. कामकाज केले जाते. त्यासाठी लागणारे औषधे ही नाममात्र रू. १/- सेवा शुल्क आकारून पुरवठा केली जातात. या शिबीराचा उद्देश असा की, तज्ञ पशुवैद्यकांकडून पशुरूग्णांची तपासणी करून योग्य औषध उपचार झाल्याने पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळता येते. व दिर्घ आजाराचे रूग्ण आहेत त्यांना पुढील औषधोपचार करण्यासाठी पशु तज्ञांचे मार्गदर्शन लाभते. | या योजनेचा लाभ सर्वस्तरातील पशुपालकांना मिळू शकतो. |
| ४ | जंतनाशक औषधे पुरवठा करणे | परजीवी जंतुमुळे जनावरांच्या शिरारात उद्‌भवणारे आजार टाळण्यासाठी जनावरांना जंतनाशक औषध पाजविणे अत्यावश्यक आहे. जंतामुळे जनावरांमध्ये पातळ हागवण याचे प्रमाण वाढते. जनावरे विशेषतः दुधाळ जनावरे अशक्त होतात. त्यांची शारिरीक वाढ खुंटते. त्यामुळे त्यांच्या दुग्धोत्पादनावर विपरीत परिणाम होतात. वासरांच्या शारिरीक वाढीत घट होते. शेळ्या /मेंढ्यामध्ये जंत झाल्याने पातळ हगवण लागून अशक्त होतात व मर्तूकीचे प्रमाण वाढते. हे टाळण्यासाठी मोठ्या जनावरांना संकरीत वासरे शेळ्या / मेंढ्या यांना दर ३ महिन्यातून एकदा जतंनाशक औषध पाजणे आवश्यक आहे. त्यामुळे जनावरे सदृढ व निरोगी बनतात. | या योजनेचा लाभ ग्राम पातळीवरील सर्व पशुपालकांना मिळतो. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | जंतनाशक औषधे पाजण्याचा कार्यक्रम पशुवैद्यकीय दवाखान्या मार्फत राबविला जातो. | |
| ५ | वधंत्व निवारण शिबीरे आयोजीत करणे | जनावरांचे आरोग्य अबाधीत राहिल्याने पशुपालकांची आर्थिक उन्नती होते. पशुपालकांचा मुख्य उद्देश दुग्धोत्पादनाचा असतो. त्यासाठी त्यांचेकडील गायी / म्हशी वेळेवर माजावर येणे व वेळेवर संयोग होवून गर्भधारणा झाल्यानंतर गाई- म्हशी वेळेवर वितात व दुग्धोत्पादन होते. गाई - म्हशी वयात आल्यावर वेळेवर माजावर येणे हा निसर्गाचा नियम आहे. असे घडले नाहीतर गाई-म्हशीमध्ये वंध्यत्व निर्माण होते. त्यावर वेळीच औषधोपचार केला तर हे वंधत्व दुर होते. दुभत्या जनावरांचा जादा भाकड काळ पशुपालकांना आर्थिक दृष्ट्या परवडत नाही. सदरचे आर्थिक नुकासन टाळावे. म्हणून पशुसंवर्धन विभागा मार्फत पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात गायी / म्हशी मधील वंधत्व दुर करण्यासाठी वंधत्व निवारण शिबीरे आयोजीत करण्यात येतात. या शिबीरात आलेल्या गायी / म्हशी तज्ञ पशुवैद्यकाकडून तपासणी करून योग्यतो औषधोपचार केला जातो. व पुढील औषधोपचारासाठी ही तज्ञांचे मार्गदर्शन लाभते. | या योजनेचा ( शिबीराचा) लाभ सर्व स्तरातील पशुपालकांना मिळतो. |
| ६ | सहकार महर्षि कै. शंकरराव मोहिते-पाटील आदर्श गोपालक पुरस्कार योजना | शास्त्रीयदृष्ट्या उत्कृष्ट पशुपालन करून दुग्धोत्पादनात वाढ करणा-या त्या पशुपालकाचा आदर्श इतर पशुपालकांनी घ्यावा. त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी आदर्श गोपालक पुरस्कार योजना राबविण्यात येते. यामध्ये पशुपालकाने पशुधनासाठी शास्त्रीय पध्दतीने गोठा, गोठ्यातील स्वच्छता, पशुधनाना वेळोवेळी करून घेण्यात आलेले रोगप्रतिबंधक लसीकरण, व्यवस्थापन व दुग्धोत्पादन यांचा समावेश आहे. पशुधनापासून मिळणा-या दुग्धोत्पादनातुन पशुपालकांची आर्थिक उन्नती व्हावी. संकरीत पशुधन पैदासीची संगोपनाची आवड निर्माण व्हावी हा मुळ उद्देश आहे. | |

## पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद, सोलापूरकडील राबविण्यात येणा-या विविध योजनांची माहिती.सन २०१०-११

| अ.क्रं | योजनेचे नांव | योजनेचा उद्देश | निकष |
|---|---|---|---|
| **१. योजनातंर्गत योजना ( जिल्हास्तर )** | | | |
| १ | शेतक-यांच्या जमीनीवर वैरण विकासासाठी उत्तेजन | शेतक-यांच्या जनावरांना सकस हिरवा चारा उपलब्ध व्हावा. विशेषत: दुधाळ जनावरांना सकस हिरवा चारा उपलब्ध होऊन दुग्धोत्पादनात वाढ व्हावी व पशुपालकांचे आर्थिक उत्पन्न वाढावे तसेच जनावरांचे आरोग्य सदृढ व्हावे यासाठी शेतक-यांना सकस वैरणीचे पिक बियाणे यांचा पुरवठा केला जातो. बियाणे १००% अनुदानावर पुरवठा केले जातात. सदरची योजना तालुकास्तरावरील पशुधन विकास अधिकारी (वि) यांचे मार्फत राबविले जाते. | या योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभधारकाकडे स्वत:ची शेतजमीन असणे आवश्यक आहे. त्यासाठी ७/१२ चा उतारा अर्जा सोबत जोडावा लागतो. सबंधीत लाभधारकाकडे जनावरे त्यामध्ये किमान एका तरी दुधाळ गायीचा समावेश असावा. |
| २ | ॲस्कॅड योजनेतंर्गत लाळ खुरकुत रोग प्रतिबंधक लसीकरण | लाळ खुरकूत रोग हा विषाणूजन्य सांसर्गिक रोग आहे. या रोगाच्या प्रादुर्भावाने जनावरे निकामी होतात. विशेषत: कामाचे वळू या रोगामुळे निकामी होतात. पर्यायाने शेतक-यांचे आर्थिक नुकसान होते. हे टाळण्यासाठी शासनाने लाळ खुरकूत रोग मुक्त व्हावा म्हणून सर्व जनावरांना लाळ खुरकूत रोग प्रतिबंधक लसीकरण करण्याचा कार्यक्रम आखण्यात आलेला आहे. या लसीकरणाबाबत रोगाबाबत माहिती देण्यासाठी तालुकास्तरावर शेतक-यांना व पशुपालकांना शिबीरे आयोजीत करून प्रशिक्षण दिले जाते. | सदर योजना केंद्र व राज्य पुरस्कृत आहे. व या योजनेचा लाभ ग्राम पातळीवरील सर्व पशुपालकांना घेण्यात येतो. व सदरची लस शेतक-यांना मोफत असून फक्त रू १ सेवा शुल्क आकारून टोचली जाते. |
| ३ | पशुवैद्यकीय संस्थाना जीवरक्षक औषधांचा पुरवठा | पावसाळ्यात व पूरग्रस्त भागात जनावरामध्ये सांसर्गिक रोगाचा प्रादुर्भाव होतो. साथीच्या रोगामध्ये अत्यावश्यक जीवरक्षक औषधांची गरज असते. बाधीत जनावरांना जीवरक्षक औषधांचा तात्काळ पुरवठा व्हावा. यासाठी जिल्ह्यातील पशुवैद्यकीय संस्थाना या औषधांचा पुरवठा केला जातो. त्यामुळे पशुपालकांच्या पशुधनाचे आरोग्य अबाधीत राहते. व पशुपालकांचे आर्थिक नुकसाना टाळता येते. | सदरच्या योजनेचा लाभ सर्व स्तरातील पशुपालकांना मिळू शकतो. |
| ४ | पशुवैद्यकीय दवाखाने / | शासनाच्या नियमानुसार ज्या गांवातील पशुधन घटक संख्या ५०००/- | नवीन पशुवैद्यकीय दवाखाना स्थापनेसाठी |

| | | | |
|---|---|---|---|
| | पशुप्रथोमचार केंद्राची स्थापना | आहे. अशा ठिकाणी नवीन दवाखान्याची स्थापना करणे गरजेचे आहे. त्यामुळे सबंधीत गावांतील पशुधनांना वेळीच रोग प्रतिबंधक लसीकरण पशुरूग्णास वेळीच औषधोपचार व्हावा. व तात्काळ पशुआरोग्य सेवा उपलब्ध व्हावी या हेतूने नवीन पशुवैद्यकीय दवाखाना स्थापना करण्यात येतो. त्यामुळे पशुपालकांना स्थानिक पशुआरोग्य सेवा उपलब्ध करून दिल्या जातात. | ज्या गांवामध्ये व त्यालगत असणा-या गावांत ५०००/- पशुधन घटक असणे आवश्यक आहे. सदरच्या गावांस वाहतुक दळण वळण, शैक्षणिक सुविधा असावी. प्रस्तावीत गावा जवळच्या पशुवैद्यकीय दवाखान्यापासून कमीत कमी ८ कि.मी . अंतरावर असावे. |
| ५ | पशुवैद्यकीय दवाखाने / पशुप्रथोमचार केंद्रासाठी इमारती बांधणे. | जिल्ह्यात ज्याठिकाणी पशुवैद्यकीय दवाखाने कार्यरत आहेत. त्याठिकाणी दवाखान्याची स्वतंत्र इमारत नाही. अशा ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखाने / पशुप्रथोपमचार केंद्रासाठी स्वंतत्र इमारती बांधण्यात येतात. दवाखान्याची स्वतंत्र इमारत असल्यामुळे पशुवैद्यकीय अधिकारी, व कर्मचारी यांच्या राहणेची व्यवस्था होते. त्यामुळे अधिकारी व कर्मचारी मुख्यालयाच्या ठिकाणी राहून सबंधीत गांवातील पशुरूग्णांना आवश्यक पशु आरोग्य सेवा उपलब्ध होते. व या योजनेमुळे पशुवैद्यकीय सेवा सक्षमपणे उपलब्ध होते. | या योजनेसाठी लागणारी जागा सबंधीत गावा लगत असलेले गावठाण, नापिक असलेली जमीन असावी. सबंधीत जागा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी , मा. आयुक्त पशुसंवर्धन यांचे नांवाने असावी. दवाखान्यासाठी जागा कमीत कमी ४० आर असावी. |
| **राज्यस्तरीय योजनातंर्गत योजना** | | | |
| १ | विशेष घटक योजनेतंर्गत लाभार्थींना ५०% अनुदानावर दुधाळ जनावरांचे गट वाटप | या योजनेचा उद्देश असा आहे की, ग्राम पातळीवरील अनुसुचित जाती / नवबौध्दांना स्वयंरोजगार उपलब्ध व्हावा व त्यांची आर्थिक प्रगती व्हावी. यासाठी विशेष घटक योजनेतंर्गत अनुसुचित जाती / नवबौध्द या लाभार्थीना ५०% अनुदानावर ३ संकरीत गायी अथवा ३ म्हैशी असे दुधाळ जनावरांचे गट वाटप, अशी योजना आहे. | लाभार्थी हा अनुसुचित जाती / नवबौध्द या प्रवर्गातील असावा.<br>अनुदान मर्यादा : गायगट - २१९४५/- ( विम्यासह)<br>म्हैसगट - २५०८०/- |
| २ | अनुसुचित जाती / नवबौध्द लाभार्थीच्या जनावरांना दुभत्या जनावरांना खाद्य ५०% अनुदानावर पुरवठा करणे. | या योजनेचा उद्देश असा आहे की, ग्राम पातळीवरील अनुसुचित जाती / नवबौध्दांना विघयो अंतर्गत पुरविण्यात आलेल्या जनावरांना ५०% अनुदानावर खाद्य पुरवठा करणे. यामुळे जनावरांना सकस खाद्य मिळून त्यांची उत्पादन क्षमता वाढेल. | विघयो अंतर्गत पुरविणे आलेल्या जनावरांना खाद्य मिळून त्यांची उत्पादन क्षमता वाढेल. त्यामुळे शेतक-यांची आर्थिकस्तर उंचावेल. |
| ३ | शेतक-यांच्या शेतावर | राष्ट्रीय अपदा आकस्मितता निधी ( NCCF ) अंतर्गत टंचाई सादृश | सदर योजनेचा लाभ ग्राम पातळीवरील सर्व |

| | | | |
|---|---|---|---|
| | वैरण उत्पादनासाठी १००% अनुदानावर वैरण बियाणे व खत वाटप योजना | परिस्थितीमध्ये उन्हाळी व खरीप हंगामात शेतक-यांच्या शेतावर वैरण विकासाठी चारा निर्मितीस करण्यासाठी उत्तेजन देण्यासाठी प्रति शेतकरी प्रति एकर वैरणीचे बियाणे व खतासाठी रूपये ६००.०० मर्यादे पर्यंत १००% अनुदानावर बियाणे व खत पुरवठा करणे. | गटातील शेतक-यांना १००% अनुदानावर रू. ६००.०० प्रति लाभार्थी वस्तु रूपाने उदा. बियाणे, खत मिळणार आहे. लाभार्थीकडे कमीत कमी ३ ते ५ जनावरे अत्यावश्यक असून त्यातील १ तरी जनावर दुधाळ असले पाहिजे. महिला व अनु.जाती जमातीच्या लाभार्थ्यांना प्राधान्य राहील. |
| **जिल्हा परिषद, सेस योजना** | | | |
| १ | यात्रा व प्रदर्शने | जिल्ह्यात ठिकठिकाणी यात्रा भरविला जातो. सदर यात्रेच्या ठिकाणी यात्रा कमिटी पशुप्रदर्शन आयोजीत करते. सोलापूर जिल्ह्यात खिलार जातीच्या ( वळूचे ) प्रमाण जास्त आहे. सदर प्रदर्शनात जिल्ह्यातील इतर भागातून खिलार पशु प्रदर्शनात पशुपालक भाग घेतात. त्यातील उत्कृष्ट खिलार वळूंना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके दिले जातात त्यामुळे पशुपालकांमध्ये खिलार पशुपैदाशीची आवड निर्माण व्हावी व खिलार वळूंचे संगोपन, व्यस्थापन व्यवस्थीत होण्यास चालना मिळावी व खिलार जातीच्या वळूचे प्रमाण वाढावे हाच या योजनेचे मुळ उद्देश आहे. | वयोमानानुसार संगोपन, व्यस्थापन, सुदृढ आरोग्य इ. ची व्यवस्थीत जोपासना करणा-या स्पर्धेत निवड करून उत्कृष्ट संगोपन केलेल्या पशुपालकास सदर चे बक्षीस वाटप करण्यात येते. |
| २ | क्षार व जीवनसत्व औषधांचा पुरवठा करणे | सोलापूर जिल्हा हा दुष्काळी जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यात नियमित पाऊस पडत नाही. त्यामुळे जनावरांना सकस वैरण, चारा मिळू शकत नाही. त्यामुळे क्षार व जीवनस्त अभावी जनावरांमध्ये विशेषत: अनेक विकार उद्‌भवतात. जनावरांची वाढ पूर्ण होत नाही. गायी / म्हशी मध्ये माजावर न येणे वारंवार उलटणे इ. वंधत्व येते हे टाळण्यासाठी जनावरांना क्षार व जीवनसत्वाची औषधे / पावडर पुरविल्या जातात. त्यामुळे गायी /म्हैशी वेळेवर माजावर येतात. हे वंधत्व दुर झाल्याने पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळता येते. क्षार व जीवनसत्वाची पुरक औषधे जिल्ह्यातील सर्व पशुवैद्यकीय दवाखान्यामधून रू.१/- सेवा शुल्क आकारून पुरविली जातात. | सदर योजनेचा लाभ सर्व स्तरातील पशुपालकांना मिळतो. |
| ३ | जनावरांना पिसाळलेले | जनावरांना पिसाळलेले कुत्रे चावल्यावर बाधीत जनावर पिसाळू नये | पशुधन विकास अधिकारी (वि) पं.स. यांचे |

| | | | |
|---|---|---|---|
| | कुत्रे चावल्यावर १००% अनुदानावर श्वानदंशोत्तर लसमात्रा पुरवठा करणे. | म्हणून तात्काळ औषधोपचार व्हावा व पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळता यावे. यासाठी जि.प. सेस मधून १००% अनुदानावर सदरची लस पुरवठा करण्यात येते. सदरची योजना ही जिल्ह्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत राबविले जाते. | शिफारस पत्र घेऊन सदर लसीचा पुरवठा केला जातो. या योजनेचा सर्व स्तरातील पशुपालकांना लाभ मिळतो. |
| ४ | रोगनिदान शिबीरे आयोजीत करणेसाठी औषधे खरेदी | जिल्ह्यातील पशुवैद्यकीय संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ज्या गांवातील पशुधनांना आरोग्याची सेवा पुरविण्याची आडचणी आहेत किंवा दवाखाना सबंधीत गांवापासून दुर आहेत अशा गांवामध्ये जनावरांचे रोगनिदान शिबीर आयोजीत केले जाते. याशिबीरात तज्ञ पशुवैद्यकांना पाचरण करून शिबीरात आलेल्या पशुरूग्णाची तपासणी करून रोगनिदान करण्यात येते. व योग्यतो औषधोपचार आवश्यक असल्यास शस्त्रक्रिया, रोगप्रतिबंधक लसीकरण, कृत्रिम रेतन, खच्चीकरण, गर्भ तपासणी, वांझ तपासणी इ. कामकाज केले जाते. त्यासाठी लागणारे औषधे ही नाममात्र रू. १/- सेवा शुल्क आकारून पुरवठा केली जातात. या शिबीराचा उद्देश असा की, तज्ञ पशुवैद्यकांकडून पशुरूग्णांची तपासणी करून योग्य औषध उपचार झाल्याने पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळता येते. व दिर्घ आजाराचे रूग्ण आहेत त्यांना पुढील औषधोपचार करण्यासाठी पशु तज्ञांचे मार्गदर्शन लाभते. | या योजनेचा लाभ सर्वस्तरातील पशुपालकांना मिळतो. |
| ५ | जंतनाशक औषधे पुरवठा करणे | परजीवी जंतुमुळे जनावरांच्या शिरारात उद्‌भवणारे आजार टाळण्यासाठी जनावरांना जंतनाशक औषध पाजविणे अत्यावश्यक आहे. जंतामुळे जनावरांमध्ये पातळ हागवण याचे प्रमाण वाढते. जनावरे विशेषत: दुधाळ जनावरे अशक्त होतात. त्यांची शारिरीक वाढ खुंटते. त्यामुळे त्यांच्या दुग्धोत्पादनावर विपरीत परिणाम होतात. वासरांच्या शारिरीक वाढीत घट होते. शेळ्या /मेंढ्यामध्ये जंत झाल्याने पातळ हगवण लागून अशक्त होतात व मर्तूकीचे प्रमाण वाढते. हे टाळण्यासाठी मोठ्या जनावरांना संकरीत वासरे शेळ्या / मेंढ्या यांना दर ३ महिन्यातून एकदा जतंनाशक औषध पाजणे आवश्यक आहे. त्यामुळे जनावरे सदृढ व निरोगी बनतात. जंतनाशक औषधे पाजण्याचा कार्यक्रम पशुवैद्यकीय दवाखान्या मार्फत राबविला जातो. | या योजनेचा लाभ ग्राम पातळीवरील सर्व पशुपालकांना मिळतो. |
| ६ | वधंत्व निवारण शिबीरे | जनावरांचे आरोग्य अबाधीत राहिल्याने पशुपालकांची आर्थिक उन्नती | या योजनेचा ( शिबीराचा) लाभ सर्व |

| | | | |
|---|---|---|---|
| | आयोजीत करणे | होते. पशुपालकांचा मुख्य उद्देश दुग्धोत्पादनाचा असतो. त्यासाठी त्यांचेकडील गायी / म्हशी वेळेवर माजावर येणे व वेळेवर संयोग होवून गर्भधारणा झाल्यानंतर गाई- म्हशी वेळेवर वितात व दुग्धोत्पादन होते. गाई - म्हशी वयात आल्यावर वेळेवर माजावर येणे हा निसर्गाचा नियम आहे. असे घडले नाहीतर गाई-म्हशीमध्ये वंध्यत्व निर्माण होते. त्यावर वेळीच औषधोपचार केला तर हे वंधत्व दुर होते. दुभत्या जनावरांचा जादा भाकड काळ पशुपालकांना आर्थिक दृष्ट्या परवडत नाही. सदरचे आर्थिक नुकासन टाळावे. म्हणून पशुसंवर्धन विभागा मार्फत पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात गायी / म्हशी मधील वंधत्व दुर करण्यासाठी वंधत्व निवारण शिबीरे आयोजीत करण्यात येतात. या शिबीरात आलेल्या गायी / म्हशी तज्ञ पशुवैद्यकाकडून तपासणी करून योग्यतो औषधोपचार केला जातो. व पुढील औषधोपचारासाठी ही तज्ञांचे मार्गदर्शन लाभते. | स्तरातील पशुपालकांना मिळतो. |
| ७ | सहकार महर्षि कै. शंकरराव मोहिते-पाटील आदर्श गोपालक पुरस्कार योजना | शास्त्रीयदृष्ट्या उत्कृष्ट पशुपालन करून दुग्धोत्पादनात वाढ करणा-या त्या पशुपालकाचा आदर्श इतर पशुपालकांनी घ्यावा. त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी आदर्श गोपालक पुरस्कार योजना राबविण्यात येते. यामध्ये पशुपालकाने पशुधनासाठी शास्त्रीय पध्दतीने गोठा, गोठ्यातील स्वच्छता, पशुधनाना वेळोवेळी करून घेण्यात आलेले रोगप्रतिबंधक लसीकरण, व्यवस्थापन व दुग्धोत्पादन यांचा समावेश आहे. पशुधनापासून मिळणा-या दुग्धोत्पादनातुन पशुपालकांची आर्थिक उन्नती व्हावी. संकरीत पशुधन पैदासीची संगोपनाची आवड निर्माण व्हावी हा मुळ उद्देश आहे. | जिल्ह्यातील उत्कृष्ट पशुपालकांना हा पुरस्कार दरवर्षी प्रत्येक तालुक्यातुन एका पशुपालकांना देण्यात येतो. |

Yojana२०१०-११

**जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी**
**जिल्हा परिषद, सोलापूर**